**नि.दि.दा.क्र.८८/२०१७**
**दत्तात्रय वि. मारुती**
**नि. क्र.५४ पुढे सुरु.**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.३ ची उलटपासणी शपथेवर सुरु.**
**वादीतर्फे विधिज्ञ श्री आर.एम.चव्हाण**

६. दावा दाखल करेपर्यंत मृत्यूपत्र कुणाच्या ताब्यात होते हे मला माहिती आहे. माझ्या म्हणण्यानुसार ते रामदास मानसिंग शिंदे यांच्या ताब्यात होते. रामदास मानसिंग शिंदे यांचे मारुती गार्डे यांच्याशी कोणतेही नाते नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, साधरणतः मुळ मृत्यूपत्र हे मृत्यूपत्र करणारी व्यक्ती अथवा तिच्या जवळच्या नातेवाईकांच्या ताब्यात असते. हे म्हणणे खरे आहे की, वादी दत्तात्रय कुदळे व प्रतिवादी मारुती गार्डे यांच्यातील वाद मा. मुंबई उच्च न्यायालयापर्यंत गेला तोपर्यंतत सदरील मृत्यूपत्र कोठेही दाखल नव्हते.

७. हे म्हणणे खरे नाही की, मारुती गार्डे यांची मुलगी प्रतिवादी क्र. २ मंगल व तिचे पती त्यांना कथीतरीत्या मारहाण करीत असल्याबाबत मलता वैयक्तीकरीत्या माहिती नाही. मी शिवाजी गार्डे यांच्याकडे कामाला जात असे. हे म्हणणे खरे आहे की, मारुती गार्डे हे त्यांची मुलगी मंगल हिच्याकडे वास्तव्यास असताना तेथे दररोज जाण्याचा मला योग नव्हता. मृत्यूपत्रासह असलेले मारुती गार्डे यांचे वैदयकीय प्रमाणपत्र मृत्यूपत्र करण्याच्या पाच महिन्यांपूर्वी दिले होते. ते वैदयकीय प्रमाणपत्र सिव्हील हॉस्पीटलचे आहे. डॉक्टरांचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा कथीत मृत्यूपत्राशी कोणताही संबंध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे रामदास शिंदे यांच्याकडे ते मृत्यूपत्र मागायला जाण्याचे मला कोणतेही कारण नव्हते. साक्षीदार स्वतहुन सांगतो की शिवाजी गार्डे व त्यांच्या मुलांशी माझा संबंध होता व त्यामुळे मी तेथे गेलो होतो.

८. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात परीच्छेद क्र. १ ते ७ मध्ये सांगितलेला संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मारुती गार्डे यांनी माझ्यासमोर कोणतेही मृत्यूपत्र केलेले नाही.

**उलटतपास पूर्ण**
**फेरतपास काहीही नाही.**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत
*स्वाक्षरी/–*
(आर. एम. भेंडे)
दिनांक :– ११/०८/२०२३ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, वाई.